(45)

Health Department
Ratnagiri Zilla Parishad
I No ..........
18 APR 1987
Branch
D.H.O.

बिगर आदिवासी विभाग.

आरोग्य उपकेंद्रे स्थापन करण्याबाबत व स्त्री आरोग्य अभ्यागता सहाय्यक परिचारिका प्रसाविका व अर्धवेळ सेवकांची पदे निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय, क्र. पीएचसी-१०८६/२०७०/सीआर/१३/८७/पीएच-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २६ मार्च, १९८७

वाचा :- सहसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे क्रमांक-डीएचएस/पीडीई-ॲन्युअल प्लॅन/सबसेंटर/डी-७, दिनांक २३.४.८६ चे पत्र.

निर्णय :- किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण विभागात बिगर आदिवासी भागात ५००० लोकसंख्येसाठी व आदिवासी भागात ३००० लोकसंख्येसाठी १ आरोग्य उपकेंद्र असणे आवश्यक आहे. शासनाच्या नव्या धोरणानुसार १९८७ च्या लोकसंख्येच्या आधारावर उपकेंद्रे मंजूर करावयाची आहेत. त्याप्रमाणे १९८७ च्या लोकसंख्येला अनुसरुन महाराष्ट्रात १०८०० आरोग्य उपकेंद्रे स्थापन करणे आवश्यक आहे. पैकी ७७११ उपकेंद्रे सध्या अस्तित्वात आहेत त्यामुळे ३०८९ उपकेंद्रे [सातव्या] ७ व्या पंचवार्षिक योजनेत स्थापन करावयाची बाकी आहेत. ह्यापैकी १२०० उपकेंद्रे १९८६-८७ साली स्थापन करण्याचे शासनाने ठरविले आहे.

या १२०० उपकेंद्रापैकी ९८९ उपकेंद्रे बिगर आदिवासी विभागात स्थापन करण्यास या आदेशान्वये मंजुरी देण्यात येत आहे. या उपकेंद्रांची जिल्हानिहाय वाटणी सोबतच्या "अ" तक्त्यात दाखविल्याप्रमाणे राहील.

२. या उपकेंद्रासाठी प्रत्येकी १ याप्रमाणे ९८९ सहाय्यक परिचारिका प्रसाविकांची पदे रु. २९०-१०-३९०-१५-४६५-वाढ-१५-५४० या वेतनश्रेणीत व ९८९ अर्धवेळ सेवकांची पदे रु. ५० दरमहा या वेतनावर मंजूर करण्यात येत आहेत.

त्याचप्रमाणे ६ उपकेंद्रासाठी १ या प्रमाणात ९८२ उपकेंद्रासाठी १६३ स्त्री पर्यवेक्षकांची [स्त्री आरोग्य अभ्यागता] पदे रु. ३६५-१५-५००-२०-६६०-वाढ-२०-७६० या वेतनश्रेणीत मंजूर करण्यात येत आहेत. या पदांचे जिल्हानिहाय वाटप सोबतच्या तक्ता "ब" मध्ये दाखविल्याप्रमाणे राहील. वरील सर्व पदे प्रथमत: २.३.८८ पर्यंत चालू राहतील.

३. यावरील खर्च "२८२ आरोग्य, स्वच्छता व पाणी पुरवठा-ए-आरोग्य व स्वच्छता [एन][तीन] महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ याच्या कलम १८७ अन्वये योजनांतर्गत अनुदाने केंद्र पुरस्कृत योजना मागणी क्र. १८७" या शीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व त्याखालील मंजूरीत अनुदानातून भागविण्यात यावा.

....२...

४. ही योजना केंद्र पुरस्कृत असून यावरील १००% खर्च [बांधकामाचा खर्च सोडून] केंद्र शासनाकडून मिळणार आहे. अतिरिक्त संचालक, [कुटुंब कल्याण] पुणे यांनी खर्चाची परिपूर्ती वेळेवर होईल याची दक्षता घ्यावी.

५. हा निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-सीआर-४७९%व्यय १२, दिनांक ९.५.८६ ला अनुसरून काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ अ. वा. अत्रे ]
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति,
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
अतिरिक्त संचालक, [कुटुंब कल्याण], पुणे.
सह संचालक, आरोग्य सेवा, [आरोग्य], पुणे.
उप संचालक, आरोग्य सेवा, [सर्व मंडळे]
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे जिल्हा आरोग्य अधिकारी.
महालेखापाल, अकौंटस व एनटायटलमेंट, मुंबई/नागपूर.
महालेखापाल, ऑडीट, मुंबई/नागपूर.
नियोजन विभाग,
वित्त विभाग [व्यय १२]
बोयुडा, ]
पीएच-१ ] सार्वजनिक आरोग्य विभाग.
पीएच-५ निवड नस्ती ]
पीएच-४

मु२६३८७.

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक-पीएचसी-१०८६/२०७०/सीआर-१३/८६, पीएच-५, दिनांक २६ मार्च १९८७ चे सहपत्र.

तक्ता "अ"

उपकेंद्राचे जिल्हा निहाय वाटप

[बिगर आदिवासी विभाग]

| अ. क्र. | जिल्हा | आरोग्य उपकेंद्राची संख्या |
|---|---|---|
| १. | ठाणे | – |
| २. | रायगड | – |
| ३. | रत्नागिरी | ८० |
| ४. | सिंधुदुर्ग | १२ |
| ५. | नाशिक | ४९ |
| ६. | धुळे | – |
| ७. | जळगांव | ७५ |
| ८. | सातारा | ३७ |
| ९. | सांगली | १५ |
| १०. | कोल्हापूर | ६९ |
| ११. | पुणे | ९० |
| १२. | अहमदनगर | ८० |
| १३. | सोलापूर | ५५ |
| १४. | नागपूर | ५० |
| १५. | वर्धा | २४ |
| १६. | भंडारा | २२ |
| १७. | चंद्रपूर | ४१ |
| १८. | गडचिरोली | – |
| १९. | अकोला | ३० |
| २०. | अमरावती | – |
| २१. | यवतमाळ | ५० |
| २२. | बुलढाणा | ३० |
| २३. | औरंगाबाद | ३५ |
| २४. | जालना | १० |
| २५. | बीड | ५० |
| २६. | नांदेड | ८५ |
| २७. | परभणी | – |
| २८. | उस्मानाबाद | – |
| २९. | लातूर | – |
| | एकूण | ९८९ |

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक-पोएचसी-१०८६/२०७०/सीआर-१३/आरोग्य-५, दिनांक २६. ३. १९८७चे सहपत्र.

तक्ता "ब"

स्त्री आरोग्य अभ्यागता या पदांचे जिल्हा निहाय वाटप

बिगर आदिवासी विभाग.

| अ. क्र. | जिल्हा | पदांची संख्या |
|---|---|---|
| १. | ठाणे | – |
| २. | रायगड | – |
| ३. | रत्नागिरी | ४ |
| ४. | सिंधुदुर्ग | २ |
| ५. | नाशिक | – |
| ६. | धुळे | – |
| ७. | जळगांव | २ |
| ८. | सातारा | ५ |
| ९. | सांगली | १ |
| १०. | कोल्हापूर | ४ |
| ११. | पुणे | २ |
| १२. | अहमदनगर | ३ |
| १३. | सोलापूर | ३ |
| १४. | नागपूर | २ |
| १५. | वर्धा | ४ |
| १६. | भंडारा | – |
| १७. | चंद्रपूर | – |
| १८. | गडचिरोली | – |
| १९. | अकोला | ५ |
| २०. | अमरावती | – |
| २१. | यवतमाळ | ३ |
| २२. | बुलढाणा | ४ |
| २३. | औरंगाबाद | ३ |
| २४. | जालना | १ |
| २५. | बीड | ८ |
| २६. | नांदेड | ४ |
| २७. | परभणी | – |
| २८. | उस्मानाबाद | – |
| २९. | लातूर. | – |
| | एकूण | ६० |

मु२६३८७